| MHBI140004212019 | |
|---|---|
| | दाखल दिनांक : ०२ / ०३ / २०१९<br>नोंदणी दिनांक : ०५ / ०३ / २०१९<br>निकाल दिनांक : ०५ / ०५ / २०२६<br>कालावधी : व. ०७ म. ०२ दिवस ०३ |

'अ'

# आष्टी येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, (कोर्ट क्र.३)

## ता.आष्टी, जि.बीड यांचे न्यायालयात

## (पिठासीन अधिकारी : महेश आर. बडाख)

(न्यायनिर्णय : दिनांक ०५/०५/२०२६)

**नियमित फौजदारी खटला क्र.३६/२०१९** **निशाणी क्र.११४/ब.**

| | |
|---|---|
| **फिर्यादी पक्ष** | **रामदास विठ्ठल बेल्हेकर**<br>रा. लोणी सय्यदमीर ता. आष्टी जि. बीड |
| विधीज्ञ | **श्री. बी.बी. अनारसे/ श्री. एस.एम. गळगटे** |
| **आरोपी** | १. **बन्सी किसन बेल्हेकर,** वय : ५५ वर्षे |
| | २. **कैलास किसन बेल्हेकर,** वय : ५० वर्षे, |
| | ३. **तुकाराम यदु बेल्हेकर,** वय : ६० वर्षे, |
| | ४. **सचिन कैलास बेल्हेकर,** वय : २७ वर्षे, |
| | ५. **सखाराम यदु बेल्हेकर,** वय : ६२ वर्षे, |
| | ६. **अजिनाथ बन्सी बेल्हेकर,** वय : ३५ वर्षे, |
| | ७. **सिंधु तुकाराम बेल्हेकर,** वय : ५३ वर्षे, |
| | ८. **मंगल राजु बेल्हेकर,** वय : ३१ वर्षे, |
| | ९. **जमुनाबाई नामदेव बेल्हेकर,** वय : ५० वर्षे, |
| | १०. **राणी अजिनाथ बेल्हेकर,** वय : ३० वर्षे, |
| | ११. **सुशाबाई कैलास बेल्हेकर,** वय : ४३ वर्षे, |

| | |
|---|---|
| | **१२. बजरंग बन्सी बेल्हेकर,** वय : २४ वर्षे, |
| | **१३. शरद तुकाराम बेल्हेकर,** वय : ६० वर्षे, |
| | **१४. प्रमोद नामदेव बेल्हेकर,** वय : ३२ वर्षे,<br>सर्व रा. लोणी सय्यदमीर ता. आष्टी जि. बीड |
| आरोपींचे विधीज्ञ | **श्री. एन.ई. शेकडे** |

## भाग 'ब'

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १२/०२/२०१९ |
| प्रथम खबर अहवाल | – |
| फिर्याद दाखल दिनांक | ०२/०३/२०१९ |
| दोषारोप निश्चीती दिनांक | २८/०४/२०२६ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २१/०६/२०२५ |
| निकाल राखुन ठेवल्याचा दिनांक | ––– |
| न्यायनिर्णय दिनांक | ०५/०५/२०२६ |
| शिक्षा सुनावल्याचा कालावधी लागु असल्यास | ––– |

## भाग 'क'

## फिर्यादी पक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा.क्र. | साक्षीदारांची नांवे | निशाणी क्र. | साक्षी प्रकार |
|---|---|---|---|
| १) | रामदास विठ्ठल बेल्हेकर | ८७ | फिर्यादी |
| २) | विष्णु मोहन बेल्हेकर | ९२ | साक्षीदार |

## आरोपीतर्फे साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### न्यायालयामार्फत तपासण्यात आलेले साक्षीदार

| अ.सा. | साक्षीदारांची नांवे | साक्षी प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

### फिर्यादी पक्षातर्फे देण्यात आलेल्या निशाणी

| अ.क्र. | निशाणी क्र. | कागदपत्राचा तपशील |
|---|---|---|
| १ | ८८ | अदखलपात्र गुन्ह्याची प्रत |

### मुद्देमालाचा तपशील

| अ.क्र. | मुद्देमाल क्रमांक | मुद्देमालाचा प्रकार |
|---|---|---|
| – | – | – |

## न्यायनिर्णय

## (दिनांक ०५/०५/२०२६)

आरोपी क्र. १ ते ६ व १३ विरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४३५, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ खालील शिक्षापात्र अपराधासाठी खटला चालविण्यात आला. फिर्यादीने आरोपी क्र. ७ ते १२ व १४ विरुध्द प्रकरण चालवणे नसलेबाबत नि. ११३ वर पुरसिस दाखल केली.

### फिर्यादी पक्षाचे कथन खालीलप्रमाणे–

**२.** सा.क्र. १ फिर्यादी रामदास विठ्ठल बेल्हेकर यांनी न्यायालयात तक्रार दाखल केली की, दि. १२/०२/२०१९ रोजी ते व सा.क्र. २ विष्णु बेल्हेकर स.नं. ११३ मधील जमीनीमध्ये नांगरट करण्यासाठी सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास गेले होते. दुपारी १.०० वाजण्याच्या दरम्यान फिर्यादीची आई कौशल्याबाई व दिपाली हे फिर्यादी विष्णु यांना जेवण घेऊन शेतात आल्या. फिर्यादी व विष्णु

नांगरट करत असतांना १.३० वाजण्याच्या सुमारास आरोपी क्र. १ ते १४ आले व फिर्यादीची नांगरट बंद केली. आरोपी तुकाराम बेल्हेकर याने फिर्यादीचे गचुरे धरुन व फिर्यादीला अर्वाच्च भाषेत शिवीगाळ करुन म्हणाला की, ही जमीन आमची आहे, तुम्ही या जमीनीत नांगरट करायची नाही व जमीनीतील तुमचे गुरांचे छप्पर काढुन टाकायचे नाहीतर तुमची काही खैर नाही. तेव्हा फिर्यादी म्हणाला की, ही जमीन आमची आहे. तेव्हा आरोपी क्र. १ ते ३ यांनी फिर्यादीस धक्काबुक्की करुन मारहाण करण्यास सुरुवात केली. फिर्यादी पत्नी, विष्णु व दिपाली यांनी भांडणाची सोडवासोडत करण्यासाठी गेले असता आरोपी क्र. ४ ते ६ यांनी विष्णु यास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपी क्र. ७ ते ११ यांनी दिपाली व फिर्यादीच्या पत्नीस मारहाण केली. आरोपी क्र. ५ सखाराम म्हणाला की, या आयघाल्याचे छप्पर पेटवुन त्यामध्ये यांना ढकलुन जाळुन मारुन टाका असे म्हणुन त्याचे खिशातील काडेची पेटी काढुन छप्पर पेटवले व आरोपी क्र. १२ ते १४ यांनी टेंभें करुन चारही बाजुने छप्पर पेटवुन दिले व फिर्यादीस व साक्षीदारांना त्या आगेमध्ये ढकलण्यासाठी त्यांच्यादिशेने गेले. तेव्हा फिर्यादी जीवाच्या भितीपोटी तेथुन पळुन गेले. आगीमुळे फिर्यादीचे सुमारे २० ते २५ हजार रुपयाचे नुकसान झाले. सदर घटनेमुळे फिर्यादीने पोलीस स्टेशन अंभोरा येथे जाऊन फिर्याद दिली असता, पोलीसांनी फिर्यादीची योग्य ती दखल घेतली नाही. त्यामुळे त्यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी आष्टी यांच्याकडे लेखी फिर्याद दिली त्यांनीही कार्यवाही केली नाही. सबब फिर्यादीने प्रस्तुत खटला दाखल केला.

**३.** फिर्यादी व साक्षीदारांची पडताळणी करुन आरोपी क्र. १ ते १४

विरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम ४३५, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ प्रमाणे आदेशिका जारी केली. तसेच नि. १०२ प्रमाणे आरोपी क्र. १ ते ६ व १३ तर्फे आरोपी क्र. ७ ते १२ व १४ पासुन प्रकरण वेगळे चालवण्याचा अर्ज दिल्याने त्यांच्यापासुन प्रकरण वेगळे चालवण्यात आले.

**४.** आरोपी क्र. १ ते ६ व १३ यांचे वर भारतीय दंड विधानाचे कलम ४३५, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ अन्वये दोषारोप (निशाणी क्र.१०३) निश्चित करण्यात आला. आरोपींनी त्यांचे निवेदन (नि.क्र.१०४ ते ११०) अन्वये गुन्हा नाकबुल करुन संपरिक्षेस सामोरे जाण्याची तयारी दर्शवली. फिर्यादीने नि. ११३ नुसार आरोपी क्र. ७ ते १२ व १४ विरुध्द प्रकरण चालविणे नसलेबाबत पुरसिस दाखल केली.

**५.** अभिलेखावर आरोपी क्र. १ ते ६ व १३ विरुध्द अपायकारक पुरावा मिळुन आल्यामुळे आरोपी क्र.१ ते ६ व १३ यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणे निवेदन निशाणी ११२ प्रमाणे नोंदविण्यात आले. आरोपींनी त्यांच्यामध्ये व फिर्यादी मध्ये जमिनीचा वाद असल्याने खोटी केस केल्याचा बचाव घेतला. नि. १११ वरील पुरसिस प्रमाणे फिर्यादीचा पुरावा बंद करण्यात आला. आरोपीतर्फे कोणताही साक्षीदार तपासण्यात आला नाही.

**६.** फिर्यादी पक्षातर्फे व आरोपी तर्फे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला.

**७.** या सर्व बाबींचा विचार करता खालीलप्रमाणे मुद्दे उपस्थित होतात व त्यावरील निष्कर्ष त्याखाली नमुद कारणांकरीता नोंदविले आहेत :

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | फिर्यादी पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादीचे नांगराची तोडफोड करुन छप्पर पेटवुन त्यांचे नुकसान केले ? | नाही. |
| २. | फिर्यादी पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादी यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन ईच्छापुर्वक दुखापत केली ? | नाही. |
| ३. | फिर्यादी पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादी यांना शांतता भंग घडवुन आणण्याच्या उददेशाने अपमानीत करुन ईच्छापुर्वक शिवीगाळ केली ? | नाही. |
| ४. | फिर्यादी पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादी यांना शांतता भंग घडवुन आणण्याच्या उददेशाने अपमानीत करुन फौजदारी पात्र धाकदपटशा केला ? | नाही. |
| ५. | फिर्यादी पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादीचे नांगराची तोडफोड करुन छप्पर पेटवुन त्यांचे नुकसान केले ? | नाही. |
| ६. | आदेश काय ? | आरोपी क्र.१ ते ६ व १३ यांना निर्दोष मुक्त तसेच आरोपी क्र.७ ते १२ व १४ यांना दोषमुक्त करण्यात येते. |

## :: **का र ण मि मां सा** ::

**मुद्दे क्र.१ ते ५ करीता** :

८. मुद्दा क्र.१ ते ५ एकमेकांशी संलग्न असलेने त्यांची कारणे एकत्र नोंदविण्यात येत आहेत. फिर्यादी पक्षाने आरोपींच्या विरूद्ध गुन्हा सिद्ध करण्याकरीता वर भाग 'क' मध्ये नमुद केल्याप्रमाणे केवळ दोन साक्षीदारांना तपासले आहे. नि. १११ प्रमाणे पुरसिस दिल्याने फिर्यादीपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

९. आरोपींच्या विरुध्दचा गुन्हा सिध्द करण्यासाठी फिर्यादी पक्षाने आरोपी यांनी समान उद्देशाच्या पुरस्सरणार्थ संगनमत करुन फिर्यादीचे नांगराची तोडफोड करुन छप्पर पेटवुन दिले हे सिध्द करणे गरजेचे आहे. तसेच, त्यांनी फिर्यादीस लाथाबुक्क्याने मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे देखील फिर्यादी पक्षाने संशयापलीकडे सिध्द करणे गरजेचे आहे.

१०. फिर्यादी पक्षातर्फे सा.क्र.१ – रामदास विठ्ठल बेल्हेकर (साक्षीदार क्र.१) यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, ते स.नं. १३ मध्ये नांगर हाकण्यासाठी गेले होते. त्यांचा चुलत भाऊ त्यांच्यासोबत होता. त्यांची भावजय दिपाली व आई कौशल्या ह्या भाकर घेऊन आल्या. आरोपी क्र. १ ते १४ हे पाठीमागुन आले त्यांनी त्यांना शिवीगाळ चालु केली. आरोपींनी मिळुन त्यांच्या नांगराची मोडतोड केली व छप्पर पेटवुन दिले. तसेच त्यांना मारहाण केली. आरोपी त्यांना म्हणाले की, तुम्ही येथे यायचे नाही, तुमचा काही संबंध नाही. तसेच आरोपींनी त्यांचे बैल सोडुन शिवळट आगीमध्ये टाकले. त्यानंतर ते पोलीस स्टेशनला गेले. तेथे नि. ८८ प्रमाणे अदखलपात्र गुन्हा दाखल केला. पोलीसांनी

काही कार्यवाही केली नाही. म्हणुन त्यांनी न्यायालयात सदरची फिर्याद दाखल केली.

**११.** फिर्यादी पक्षातर्फे सा.क्र.२– विष्णु मोहन बेल्हेकर (साक्षीदार क्र.२) यांनी त्यांच्या पुराव्यात असे सांगितले आहे की, दि. १२/०२/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता स.नं. ११३ मध्ये नांगर हाकण्यासाठी गेले होते. दुपारी १.०० वाजण्याच्या सुमारास कौसाबाई व दिपाली भाकर घेऊन आल्या. आरोपी क्र. ३ तेथे आला होता. त्यांनी त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. ते तिघे जण भांडणे सोडवण्यासाठी मध्ये पडले. तेव्हा आरोपींनी त्यांना मारहाण केली. त्यानंतर ते अंभोरा पोलीस स्टेशनला गेले परंतु पोलीसांनी दखल घेतली नाही.

**१२.** फिर्यादी यांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी व सा.क्र. २ यांच्या पुराव्यावरुन आरोपीने गुन्हा केल्याचे सिध्द होते. फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र.१ व २ यांची साक्ष फिर्यादीच्या साक्षीस पुरक असल्याने आरोपींविरुध्द गुन्हा शाबीत होतो. सबब आरोपींना दोषी ठरवुन शिक्षा करण्याची विनंती केली आहे. याउलट, आरोपींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला केला की, फिर्यादीचा पुरावा तसेच पडताळणी जबाब व पुराव्यामध्ये विसंगत बाबी आलेल्या आहेत. फिर्यादी यांनी त्यांच्या उलटतपासामध्ये त्यांचा जमिनीवरुन वाद असल्याने त्यांनी आरोपींविरुध्द वेगवेगळया केस केल्या असल्याचे मान्य केले आहे. तसेच, फिर्यादीने इतर कोणतेही स्वतंत्र साक्षीदार तपासलेले नाहीत. त्यामुळे आरोपींविरुध्दचे दोषारोप संशयापलीकडे सिध्द होईल इतका पुरावा अभिलेखावर आलेला नाही. सबब आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात यावे.

**१३.** अभिलेखाचे व पुराव्याचे अवलोकन केले, दोन्ही पक्षांचा युक्तीवाद विचारात घेतला. सा.क्र.१ फिर्यादी यांच्या उलटतपासात त्यांनी त्यांचे व आरोपींमध्ये दिवाणी दावा चालु आहे. दिवाणी दाव्याची मिळकत मिळावी म्हणुन त्यांनी सदरची फिर्याद दिली होती. त्यांनी सरतपासात सांगितलेला मजकुर त्यांना आठवत नसल्याचे त्यांनी सांगितले. त्यांचे दिवाणी दाव्यात तडजोड झाल्याने फौजदारी दाव्यात देखील त्यांनी तडजोड झाल्याचे मान्य केले. तसेच त्यांना इतर साक्षीदार तपासायचे नसल्याचे त्यांनी सांगितले. आरोपींनी तोडफोड करुन छप्पर पेटवल्याबाबत त्यांना आठवत नसल्याचे सांगितले. तसेच सा.क्र. २ यांनी त्यांच्या उलटतपासात सांगितले की, आरोपी व त्यांच्यामध्ये वाद मिटलेले आहे. दिवाणी वादातुन सदरची फिर्याद दिल्याचे त्यांनी मान्य केले. दि. १२/१०/२०१९ रोजी ते बाहेर असल्याने त्यांना घटनेबाबत माहिती नसल्याचे सांगितले.

**१४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता आरोपींची व फिर्यादीची आपसांत न्यायालयाबाहेर तडजोड झाल्याचे दिसते. तसेच उलटतपासामध्ये फिर्यादीने आरोपी सोबत तडजोड झाल्याचे कथन केलेले आहे. प्रस्तुत प्रकरणात तडजोड झाल्याने फिर्यादीपक्षाने फिर्यादी व सा.क्र. २ व्यतिरीक्त इतर साक्षीदार तपासलेले नाहीत. तसेच फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपी क्र. १ ते १४ यांनी घटनास्थळी येऊन शिवीगाळ करुन मारहाण केल्याचे सांगितले. परंतु सा.क्र. २ विष्णु याने त्याच्या पुराव्यात केवळ आरोपी क्र. ३ याने शिवीगाळ केल्याचे कथन केले आहे. इतर आरोपीबाबत अवक्षर देखील काढले नाही. फिर्यादीने कोणत्या आरोपीने काय केले हे देखील स्वतंत्रपणे सांगितलेले नाही. एकंदरीत फिर्यादी व सा.क्र. २ यांचा पुरावा

सुसंगत दिसुन येत नाही. तसेच अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी व आरोपींमध्ये तडजोड झाली असुन फिर्यादी व सा. क्र. २ व्यतिरिक्त इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासला नसल्यामुळे गुन्हा आरोपींनी केला असे म्हणता येणार नाही. आरोपींनी साक्षीदारांच्या उलटतपासात त्यांचा बचाव सिध्द केल्याने आरोपींविरुध्द दोषारोप संशयापलिकडे सिध्द होत नाही.

**१५**. प्राप्त परिस्थितीत उपलब्ध पुराव्याचे एकंदर अवलोकन केले असता आरोपींविरुध्द गुन्हयामध्ये गोवण्याइतपत कुठलीही बाब न्यायालयासमोर आलेली नाही. अपुऱ्या पुराव्या अभावी आरोपींनी फिर्यादीच्या नांगराची तोडफोड करुन छप्पर पेटवुन दिले व त्याअन्वये भा.दं.वि. कलम ४३५ प्रमाणे गुन्हा केला तसेच फिर्यादीस मारहाण करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली हे सिध्द होत नाही. फिर्यादीपक्षाला आरोपी क्र. १ ते ६ व १३ विरुध्द भा.दं.वि., १८६० चे कलम ४३५, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ चे आवश्यक घटक सिध्द करण्यात पुर्णपणे अपयश आल्याचे दिसुन येते. सबब, मुद्दा क्रं.१ ते ५ चे निष्कर्ष “नकारार्थी“ नोंदविले आहेत.

**<u>मुद्दा क्र.६ साठी</u>:–**

**१६.** मुद्दे क्र. १ ते ५ चा निष्कर्ष पाहता, फिर्यादीपक्ष आरोपी क्र. १ ते ६ व १३ यांचेविरुध्द आरोप शाबीत करण्यास अपयशी ठरले आहेत. त्यामुळे आरोपी क्र. १ ते ६ व १३ निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. नि. ११३ वरील पुरसिस प्रमाणे फिर्यादीने आरोपी क्र. ७ ते १२ व १४ यांच्याविरुध्द प्रकरण चालवणे नसल्याचे कथन केले. अभिलेखाचे अवलोकन केले असता, आरोपी क्र. ७ ते १२ व १४

यांच्याविरुध्द दोषारोप ठेवणेकामी कोणताही सबळ पुरावा दिसुन येत नाही. त्यामुळे फौ.प्र.सं. कलम २४५ नुसार त्यांना दोषमुक्त करणे योग्य होईल. अभिलेखावर कोणताही मुद्देमाल नाही, सबब त्याबाबत आदेश नाही. करीता, मुद्दा क्र. ६ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत केले आहेत :-

:: **आदेश** ::

| | |
|---|---|
| १. | आरोपी क्र.१ ते ६ व १३ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४८(१) प्रमाणे भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ४३५, ३२३, ५०४, ५०६, ४२७ सह कलम १४९ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त करण्यात येते. |
| २. | आरोपी क्र. ७ ते १२ व १४ यांना फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २४५ नुसार दोषमुक्त करण्यात येते. |
| ३. | आरोपींचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येतात. |
| ४. | आरोपी क्र. १ ते ६ व १३ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७(अ) प्रमाणे प्रत्येकी रुपये १५,०००/- चे वैयक्तिक बंधपत्र व एक जामीनदार द्यावा. |
| | (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर) |

MAHESH RAMCHANDRA BADAKH

Digitally signed by MAHESH RAMCHANDRA BADAKH
Date: 2026.05.05 16:33:33 +0530

( महेश आर. बडाख )
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.३), आष्टी

ठिकाण – आष्टी
दिनांक – ०५/०५/२०२६

## CERTIFICATE

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment / order"

Dictated on : 05/05/2026
Transcribed on : 05/05/2026
Checked & signed on : 05/05/2026

**Sd/-**
Rahul S. Abnave,
(Jr. Clerk)